REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# संत साहित्याचे मराठी भाषाविषयक योगदान



**प्रा. संजय साठे**
**विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी.**

## प्रस्तावना :

मानवी जीवनामध्ये भाषेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना मानवाच्या उत्क्रांतीच्या प्रवासात भाषा ही सर्वात महत्त्वाची बाब ठरली आहे. भाषेमुळेच मानवाच्या संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि वहन होत आले आहे. म्हणूनच संतांच्या सामाजिक योगदानाचा विचार करता त्यांनी मराठी भाषेविषयी घेतलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. या भाषेचे महत्त्व सांगताना कबीर म्हणतात की,

" साधो, शब्द-साधना कीजै ।
जे ही शब्दसे प्रकट भये सब, सोई शब्द गहि लीजै।"

याचा अर्थ ; हे साधुंनो, ज्यापासून सर्व काही उत्पन्न हाते त्या शब्दांची साधना करा.

जिला आपण भाषा म्हणतो ती आधी बोलीच्या स्वरूपात अस्तित्वात असते. ही बोली सामान्य माणसांनी निर्माण केलेली असते. आपल्या शारीर, मानसिक, भावनिक आणि वैचारिक गरजा भागवण्यासाठी तो या भाषेचा जोरकसपणे वापर करत असतो. नव्हे या बोलीमुळेच तो या आपल्या सर्व गरजा योग्य प्रकारे भागवू शकतो. मध्ययुगीन काळात ज्यांच्या हातात सांस्कृतिक, आर्थिक सूत्रे होती त्यांनी आपल्या मतलबापोटी या बोलींना हीन ठरवले. त्यांनी आपल्या स्वतःच्या भाषेलाच श्रेष्ठ ठरवले आणि तीच ज्ञान-विज्ञानाची, धर्म-धर्मशास्त्रांची भाषा बनली. सर्वसामान्य माणसांना आपले गुलाम बनवायचे असेल तर त्यांना भाषेचे भय घालणे आवश्यक आहे या मानसिकतेने त्यांनी पहिल्यांदा भाषा-भाषांमध्ये भेद निर्माण केले. या गुलामीतून सामान्य माणसांची मुक्तता करायची असेल तर त्यांच्या बोली भाषांना प्रतिष्ठा निर्माण करून देण्यावाचून गत्यंतर नाही हे संतांनी नेमकेपणाने हेरले होते. शेवटी भाषा हे संवादाचे माध्यम आहे. अडाणी, भोळ्याभाबड्या, निरक्षर, सामान्य लोकांना आपलसं करायचं असेल तर त्यांना त्यांच्याच भाषेतून बोललं पाहिजे, त्यांच्याच भाषेतून त्यांचं प्रबोधन केले पाहिजे हे संतांना चांगलेच उमजले होते. ब्राह्मणांनी वेद, स्मृती आणि पुराणे् संस्कृतात लिहिली होती. त्यात नेमके काय आहे, त्याचा नेमका अर्थ काय आहे हे सामान्य माणसांना कळणे दुरापास्तच होते. कारण या भारतातच धर्मशास्त्रांप्रमाणे शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना संस्कृत शिकण्याचा अधिकार नव्हता. तो त्यांचा कावा होता. इसवी सन चौथ्या शतकापासून बौद्ध धम्माने जनसामान्यांच्या बोली भाषेत आपले तत्त्वज्ञान आणि जीवनमार्ग सांगण्याची एक अपूर्व क्रांती केली होती. पण पुढे अश्वघोषाच्या काळात संस्कृत भाषेचे पुनरूज्जीवन झाले. संतांच्या काळात तर या संस्कृतचे अधिकच स्तोम माजले होते.

पुढे संतांनी भक्ती आंदोलन उ भे केले. हे आंदोलन ब्राह्मणी धर्म आणि संस्कृत भाषेच्या विरोधात होते. पुरोहित ब्राह्मण वर्ग या आंदोलनाच्या विरोधात होता. कारण या आंदोलनाने ब्राह्मणी कर्मकांड आणि जातीव्यवस्थेला धार्मिक क्षेत्रात पूर्णपणे नकार दिला होता. महाराष्ट्रात यादवांच्या काळात हे आंदोलन पहिल्यांदा चक्रधरांनी उभे केले. त्यांनी मराठी भाषेवर प्रचंड प्रेम केले. आपल्या पंथाचा प्रचार आणि प्रसार करताना तो मराठीच करावा अशी आज्ञा त्यांनी आपल्या अनुयायांनाही केली होती. म्हणूनच त्यांच्या शिष्यांनी संस्कृत अभिमान्यांना खडसावताना म्हटले,

"तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे निरूपिली मऱ्हाटी : तियाचि पुसा : "

ज्ञानदेवांनीही मराठी मातृभाषेविषयीचा आपला अभिमान प्रकट करताना,

"तिरे संस्कृताची गहने । तोडोनी मऱ्हाठीया केली शब्द सोपाने ।
रचिली धर्मनिधाने । निवृत्ती देवे ।।
--
राजहंस चालणे । जागी जाले हो शहाणे ।
आणिका काय कोणे । चालोचि नये ।।
--

हां हो नवल नोव्हे देशी । मऱ्हाठी बोलिजे तरी ऐशी ।
वाणे उमटत आहे मा आकाशी । साहित्य रंगाचे ।।"
शेवटी तर ज्ञानदेव म्हणतात की,
" माझा मऱ्हाटाचि बोलू कवतुके ।
परि अमृतातेहि पैजा जिंके ।।"

या संतांच्या भाषिक आंदोलनाचा परिणाम असा झाला की, त्या त्या प्रदेशातल्या सामान्य माणसाला भाषिक आत्मभान आले. आणि जेव्हा आपल्या स्वतःच्या भाषेत अभिव्यक्त होण्यासारखी परिस्थिती निर्माण होते तेव्हा सामान्य माणूस स्वत: अभिव्यक्त होतानाच स्वतःचाही शोध घेऊ लागतो. आत्मभान, बुद्धी आणि प्रतिभा किंवा कल्पकता यामुळेच मानवाचे जीवन उ न्नत झाले आहे. मध्ययुगीन काळात संतांच्या या भाषिक आदोलनामुळे सामान्य माणूस आपल्या मातृभाषेत अभिव्यक्त होऊ लागला. तसतसे त्याच्या मनात स्वतःबद्दल, धर्म आणि त्या धर्मातल्या अनिष्ठ रूढींबद्दल, देव आणि धर्माबद्दल आणि स्वतःच्या सामाजिक स्थानाबद्दल अनेक प्रश्न पडू लागले. कारण त्यांच्या परिवर्तनाची काळजी वाहणारे संतंही या व्यसस्थेला जाब विचारत होते.

" नामदेव मनी उपरति धरी । हीन जाती मोरी काहे प्रभू करी ? " (संत नामदेव, २२७३)
" देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो शुद्ध बुद्ध ।।
देहीचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ।।" (संत चोखामेळा)
"आमुचि केली हीन याती । तुज का न कळे श्रीपती ।।
जन्म गेला उ ष्ट खाता । लाज न ये तुमच्या चित्ता ।।" (संत कर्ममेळा)
" शूद्रवंशी जन्मलो । म्हणोनि दंभे मोकलीलो ।।
घोकाया अक्षर । मज नाही अधिकार ।।
सर्व भावे दीन । तुका म्हणे यातिहीन ।। (संत तुकाराम)

अशा अनेक संतांनी स्वतःला आणि व्यवस्थेल असे अनेक प्रश्न विचारले. त्याचा परिणाम असा झाला की, सामान्य माणूसही आपल्या जगण्याबद्दल, वाट्याला आलेल्या जीवनाबद्दल विचार करायला लागला आणि यातूनच त्यांचे आत्मभान जागे होण्याला मदत झाली. आणि यामुळेच पुढे मानवतावादी दृष्टिकोन निर्माण होण्यास सोयीचे झाले. बुवाबाजी, अंधश्रद्धेला बळी पडलेल्या समाजाला त्यातून वर काढून भक्तीचा मार्ग दाखवावा अशी संतांची प्रामाणिक इच्छा होती. त्यामुळे त्यांचे जामाणसात आदराचे स्थान निर्माण झालेले होते. आणि म्हणूनच त्यांचा विचारही लोकांनी स्वीकारलेला होता. हे संतांचे सामाजिक योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे

- **संदर्भ :**


१. तुकाराम गाथा / संपा. स.के.नेऊरगांवकर / कॉन्टिनेन्टल प्रकाशन / तृतीय आवृत्ती , मार्च, २००३.
२. श्री सकल संतवाणी (खंड दुसरा) / गीता प्रेस, गोरखपूर .
३. संत साहित्य : शोध आणि बोध / डॉ. यु.म.पठाण / दिलीपराज प्रकाशन.
४. संत साहित्य : काही अनुबंध / डॉ. अशोक कामत / पद्मगंधा प्रकाशन.
५. संत साहित्य आणि दलित संवेदन / रा.तु.भगत / चैतन्य प्रकाशन.
६. संत चोखामेळा आणि परिवार : विवेचक अभ्यास / डॉ. सौ. पद्मावती श्रोत्रीय / गोकुळ प्रकाशन / १९९७.
७. भक्ती आणि धम्म / डॉ. रावसाहेब कसबे / लोकवाङ्.मय गृह / २०१६.